मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पुणे, पिंपरी चिंचवडमधील विजेसाठी तीनशे पन्नास कोटी

## राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार जगताप यांच्या मुद्द्यांवर माहिती!

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवडच्या वीज आराखड्यासाठी पुनर्गठित वितरण क्षेत्रासह आणि इतर योजनांमधून निधीची तरतूद केली आहे. पुणे जिल्ह्यासाठी ११०० कोटींचा प्रस्ताव आहे. त्यातून पुणे आणि पिंपरी चिंचवडसाठी ३५० कोटी आहेत. ताथवडे उपकेंद्राचा प्रस्ताव महापारेषणकडे दीड वर्षांपासून का प्रलंबित आहे, याची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. पुण्यातील लोकप्रतिनिधींसोबत लवकरच बैठक घेऊन या सर्व प्रलंबित कामांचा आढावा घेतला जाईल, असे आश्वासन ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.



पिंपरी चिंचवडमधील औद्योगिक, व्यावसायिक आस्थापना व नागरिकांच्या वीजपुरवठ्याबाबत वारंवार तक्रारी येत आहेत. त्यांना चांगली सेवा देण्यासाठी पुनर्गठित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (आरडीएसएस) १९२ कोटींचा प्रस्ताव आणि नागपूर पुणे स्पेशल असिस्टंट स्कीम (एनपीएसएएस) योजनेअंतर्गत १५६ कोटींचा शासनाकडे प्रलंबित प्रस्तावाला मंजुरी देणे आणि दीड वर्षांपासून प्रलंबित ताथवडे उपकेंद्राच्या प्रस्तावाकडे आमदार शंकर जगताप यांनी आक्रमकपणे लक्ष वेधले. त्यावर राज्यमंत्री साकोरे- बोर्डीकर बोलत होत्या.'

आमदार जगताप म्हणाले, "आयटीपार्कमुळे रावेत, किवळे, मामुर्डी, वाकड, ताथवडे आणि पिंपळे सौदागर भागात 'वर्क फ्रॉम होम' करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. मात्र, विद्युत वाहिन्यांवरील लोड अधिक असल्यामुळे वीज पुरवठ्याची सात्यतता, गुणवत्ता यामध्ये त्रुटी आणि वारंवार वीज खंडित होण्याच्या प्रकारांना नागरिक कंटाळले आहेत. मोशी, चऱ्होली आणि ताथवडे येथे अतिउच्चदाब उपकेंद्र उभारा. काळेवाडी, हिंजवडी, बिजलीनगर शाखांचे विभाजन करून नवीन कार्यालये सुरू करा. भोसरीतील 'सेंच्युरी इंका' उपकेंद्रामध्ये दोन नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर बसवा. ओव्हरहेड वाहिन्यांचे भूमिगत वाहिन्यांमध्ये रूपांतर करा.'

# शहरी;ग्रामीण भागांमध्ये धुळवड खेळताना हे सुद्धा लक्षात ठेवा !

## धुळवड खेळताना शरीराची काळजी घ्यावी असे वैद्यकीय तज्ज्ञांनी आग्रहाने सांगितले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

वसंत ऋतूची सुरुवात आणि मराठी वर्षातील सर्वात शेवटचा सण म्हण जे धुलिवंदन. शहरी भागात धुळवडीला तर ग्रामीण भागांमध्ये रंगपंचमीला रंग खेळले जातात. बुरा ना मानो होली है ! असं म्हणत एकमेकांसोबत रंगांची उधळण केली जाते. धुळवड खेळताना शरीराची काळजी घ्यावी असे वैद्यकीय तज्ज्ञांनी आग्रहाने सांगितले आहे.

सोसायट्या, कॉलनी, गल्लोगल्ली रंग उधळले जातात. लहान मोठे या दिवशी रंगात न्हाऊन निघतात. मात्र, हे करत असताना आपल्या त्वचेची आणि डोळ्यांची काळजी घेणे आवश्यक आहे. आरोग्याला अपाय होऊनये नैसर्गिक रंग वापरणे, रंग खेळण्यापूर्वी व नंतर काळजी घेणे गरजेचे असल्याचे डॉक्टर सांगतात.



### रासायनिक रंगांमध्ये होणारे संभाव्य दुष्परिणाम

» काही रासायनिक रंगांमुळे लालसरपणा, खाज, सूज, पुरळ किंवा चट्टे येणे. त्वचेची जळजळ होणे, त्वचा कोरडी पडणे. रंग, घाम, धूळ आणि तेल यांच्या मिश्रणामुळे त्वचेची छिद्रे बंद होतात. तीव्र उन्हात रंग खेळल्यामुळे त्वचा काळवंडते. रंग डोळ्यात जाऊन डोळ्यांची जळजळ होणे, पाणी येणे. डोळे लाल होणे.

### होळीपूर्वी घ्यावयाची काळजी

» रंग खेळण्यापूर्वी चेहऱ्याला मॉइश्चरायझर व सनस्क्रीन लावा., चेहरा, हात, पाय व केसांना यांना नारळाचे किंवा बदामाचे तेल लावा.पूर्ण बाह्यांचे व सुती कपडे परिधान करा. नैसर्गिक रंगांची निवड करा.

### होळी खेळताना

» चेहऱ्यावर रंग घासू नका. डोळे आणि तोंड सुरक्षित ठेवा.भरपूर पाणी प्या. जास्त वेळ ओले कपडे अंगावर ठेवू नका.

"होळीच्या दिवशी जास्त वेळ उन्हात राहिल्यामुळे आणि पाण्यात भिजल्यामुळे शरीराला भरपूर घाम येतो. रंग ओले झाल्यामुळे ते लवकर निघत नाहीत. व त्यांचा संसर्ग होऊन शरीरावर पुरळ येऊ शकतात तसेच खास सुटू शकते. त्यामुळे रंग खेळल्यानंतर पाणी न खेळण्याचा सल्ला दिला जातो. तसेच रंग जरी नैसर्गिक वापरले तरी ते डोळ्यात जाऊ नये यासाठी गॉगल वापरावा. होळीचा आनंद नक्की घ्या, परंतु त्वचेची स्वच्छता राखणे गरजेचे आहे.

- डॉ. प्रियंका लंघे त्वचारोग तज्ञ

(उर्वरित पान 2 वर )

# रस्त्यावरील कोंडी दूर करण्यासाठी 32 हजार कोटींचा भुयारी मार्ग

## येरवडा ते कात्रज कॉरिडॉरच्या नव्या अलाईनमेंटसाठी पीएमआरडीएतर्फे सखोल अभ्यास

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराचा वाढता विस्तार आणि वाहनांच्या अवाढव्य संख्येमुळे रस्त्यांवरचा भार वाढला आहे. त्यामुळे कोंडीवर 'पाताळातून' तोडगा काढण्याची चाचणी सुरू केली आहे. या 32 हजार कोटी रुपयांच्या भुयारी मार्ग (टनेल) प्रकल्पाच्या आराखड्यात मोठे फेरबदल करण्यात येत असून, सहा ते सात वेगवेगळ्या अलाईनमेंट्सचा सखोल अभ्यास करण्याचे निर्देश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) 'मोनार्क' या सल्लागार संस्थेला दिले आहेत.

पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरणाची (पुम्टा) ची आढावा बैठक विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या बैठकीत या महाप्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालावर (डीपीआर) महत्त्वपूर्ण चर्चा झाली. सुरुवातीला हा प्रकल्प 'येरवडा ते कात्रज' असा 54 किलोमीटरचा उत्तर-दक्षिण कॉरिडॉर म्हणून आखण्यात आला होता.




### व्यवहार्यता आणि निधी उभारणी

» सुमारे ३२ हजार कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी व्यवहार्यता अहवाल अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. प्रत्यक्ष खर्च, निधीची उभारणी, कामाचा कालावधी आणि टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी याबाबतचा स्पष्ट आराखडा तयार केला जाणार आहे. सुधारित प्री-फिजिबिलिटी रिपोर्ट सादर झाल्यानंतरच सविस्तर प्रकल्प अहवालावर शिक्कामोर्तब होईल. प्रकल्प आर्थिकदृष्ट्या शाश्वत आणि दीर्घकालीन फायदेशीर ठरेल याची खात्री करण्यावर भर देण्यात येत आहे.

मात्र, आता या मार्गाचे सुरुवातीचे आणि शेवटचे टोक बदलण्यासोबतच शहरातील पूर्व-पश्चिम भागांतील वर्दळीचे रस्तेही यात जोडता येतील का, याची चाचपणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रकल्पाची व्यवहार्यता आणि विविध पर्यायांचे रेटिंग स्पष्ट झाल्याशिवाय 'डीपीआर'वर शिक्कामोर्तब करण्यात येणार नाही. हा प्रकल्प नागरिकांसाठी खऱ्या अर्थाने उपयुक्त ठरावा, अशी भूमिका पीएमआरडीएने घेतली आहे.

कोणताही मार्ग निश्चित करण्यापूर्वी नागरिकांच्या प्रवासाची पद्धत आणि दिशा यांचा सखोल अभ्यास अनिवार्य असल्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी पुम्टाच्या बैठकीत स्पष्ट केले. तसेच, भुयारी मार्गातून बाहेर पडणारी वाहतूक पुन्हा कोंडी निर्माण करणार नाही, यासाठी प्रकल्पाचे एक्झिट पॉइंट्स आणि शहराच्या पार्किंग धोरणाची सांगड घालण्याची गरज महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी व्यक्त केली.

### आराखड्यात मोठे फेरबदल

» पुणे महानगर प्रदेशातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेऊन प्रस्तावित भुयारी मार्ग प्रकल्पाच्या मूळ आराखड्यात मोठे बदल करण्यात येत आहेत. सुरुवातीला 'येरवडा ते कात्रज' असा ५४ किलोमीटरचा उत्तर-दक्षिण कॉरिडॉर निश्चित करण्यात आला होता. मात्र, आता शहरातील पूर्व-पश्चिम भागातील वर्दळीचे मार्ग जोडण्याची शक्यता तपासली जात आहे. सहा ते सात वेगवेगळ्या अलाईनमेंट्सचा सखोल अभ्यास करून त्यांचे तांत्रिक, आर्थिक व सामाजिक परिणाम तपासले जाणार आहेत. विविध पर्यायांचे तुलनात्मक विश्लेषण केल्यानंतरच अंतिम मार्ग निश्चित केला जाणार आहे.

### कोंडीमुक्तीचा दीर्घकालीन उपाय

» भुयारी मार्गातून बाहेर पडणारी वाहतूक पुन्हा शहरात कोंडी निर्माण करू नये, यासाठी एक्झिट पॉइंट्सचे नियोजन आणि शहराच्या पार्किंग धोरणाची सांगड घालण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. नागरिकांच्या प्रवासाची दिशा, दैनंदिन वाहतूक पद्धती आणि भविष्यातील लोकसंख्या वाढ लक्षात घेऊन प्रकल्पाची आखणी केली जाणार आहे. योग्य नियोजन झाल्यास हा प्रकल्प पुणे शहरासाठी कोंडीमुक्तीचा दीर्घकालीन आणि प्रभावी उपाय ठरू शकतो.

# अर्बन स्ट्रीट डिझाईन व हरित सेतू प्रकल्प सुशोभिकरण नव्हे : आयुक्त श्रावण हर्डीकर

## पादचारी व सायकलस्वारांसाठी सुरक्षित कॉरिडॉर; सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरभरात अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार पदपथ व सायकल ट्रॅक करून पादचारी व सायकलस्वारांना स्वतंत्र सुरक्षित मार्ग निर्माण केला जात आहेत.

तसेच, हरित सेतू प्रकल्पात घरापासून थेट बीआरटी बसथांबा, मेट्रो व रेल्वे स्टेशनपर्यंत पायी जाता येईल, अशी व्यवस्था करण्यात येत आहे. हे दोन्ही प्रकल्प लोकांसाठी उपयुक्त असून, ते त्यातून रस्ते सुशोभिकरण (रोड ब्युटिफिकेशन) केले जात असल्याचे समज चुकीचा आहे, असे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.



हरित सेतू आणि अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार रस्ते अरुंद करून पदपथ व सायकल ट्रॅक प्रशस्त करून सुशोभिकरण करण्यात येत आहे. ते काम रस्ते सुशोभिकरण नाही, असा दावा आयुक्तांनी केला आहे. वाहन चालकांप्रमाणे पादचारी व सायकलस्वारांना सुरक्षितपणे मार्ग असावा म्हणून ही व्यवस्था करण्यात येत आहे. जवळच्या अंतरावर जाण्यासाठी नागरिकांनी स्वतःचे वाहन न वापरता पायी किंवा सायकलवर जाणे अपेक्षित आहे.

तसेच, बीआरटी थांबा, मेट्रो व रेल्वे स्टेशनपर्यंत ये-जा करण्यासाठी मार्ग जोडले जात आहेत. त्यासाठी सुरक्षित कॉरिडॉर तयार केले जात आहेत. सार्वजनिक व्यवस्था सक्षम केली जात आहे. शहरात बसची संख्या वाढून फेऱ्या वाढविण्यासाठी पीएमपीएलच्या निधीत यंदा वाढ केली आहे. त्या ठिकाणी वाहने पार्क होणार नाहीत. अतिक्रमण होणार नाही, यासाठी महापालिका प्रशासन कठोर भूमिका घेणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

शहरात खासगी वाहनांची संख्या वाढत आहे. त्याप्रमाणात पार्किंग व्यवस्था निर्माण करणे अशक्य आहे. घरात दोन ते तीन मोटारी असल्याने दोन वाहने रस्त्यावर पार्क केली जातात. काही ठिकाणी जागा मिळते, तर काही ठिकाणी नाही. खासगी वाहने वापरण्यापेक्षा बस, मेट्रो किंवा फिडर रिक्षांने प्रवास करावा, असा सल्ला त्यांनी नागरिकांना दिला आहे.

# पुणे, पिंपरी चिंचवडमधील विजेसाठी तीनशे पन्नास कोटी

( पान 1 वरून )

धुलिवंदन पिंपरी चिंचवडमध्ये मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. ठिकठिकाणी होळीचे कार्यक्रम आयोजित केले जातात. मित्र-परिवारासोबत रंग खेळणे, पाण्यात भिजणे ही सणाची खासियत आहे. मात्र, या सणासाठी बाजारात दाखल झालेले रंग कृत्रिम रसायनांपासून बनवलेले असतात. या रंगांमध्ये शिसे, पारा, क्रोमियम, कॉपर सल्फेट, मिका पावडर यांसारखे घटक असू शकतात. हे घटक त्वचा, केस आणि डोळ्यांसाठी हानिकारक ठरू शकतात. त्यामुळे त्वचेचा संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे होळी ही नैसर्गिक व कोरड्या रंगांनीच खेळावी असा सल्ला डॉक्टर देतात.

### होळीनंतरची काळजी

» प्रथम साध्या पाण्याने रंग धुवा. सौम्य फेसवॉश किंवा क्लेन्झर वापरा. अलोव्हेरा जेल / कॅलामाइन लोशन लावा. त्वचा पूर्णपणे कोरडी पुसा.ओले कपडे त्वरित बदला.आवश्यक असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने अँटीफंगल पावडर वापरा. केसांसाठी सौम्य शाम्पू व कंडिशनर वापरा.

### डॉक्टरांचा सल्ला कधी घ्यावा?

» तीव्र सूज किंवा फोड. सतत खाज किंवा जळजळ.गोलाकार लालसर डाग. डोळ्यांना त्रास. केस अचानक गळणे.

# कामांच्या टेंडर बाबत आयुक्तांनी घेतला मोठा निर्णय !

## नदी प्रदूषण रोखण्यासाठी पुणे महानगरपालिकेचा मास्टर प्लॅन; सोसायट्यांच्या एसटीपीवर 'डिजिटल' वॉच.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी महापालिकेने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी होणारे हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेने सेन्सर बसविणे बंधनकारक केले आहे. त्याच प्रमाणे नदीत सोडले जाणारे मैलापाणी किती प्रदूषित आहे, हे लक्षात यावे आणि प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी गृहनिर्माण सोसायट्यांमधील खासगी सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांवर (एसटीपी) देखील सेन्सर बसविण्याचा विचार प्रशासनाने सुरु केला आहे.

शहरातून वाहत असलेल्या मुळा-मुठा नदीचे पाणी शुद्ध रहावे, यासाठी महापालिका विविध प्रकल्प राबवित आहे. यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी देखील खर्च केला जातो. नदीत पाणी सोडताना त्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकेने शहराच्या विविध भागात मैलापाणी शुद्धीकरण केंद्र सुरु केली आहेत.

तसेच शहरातील मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांनी सांडपाणी शुद्ध करण्यासाठी छोट्या आकारातील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारणे महापालिकेने बंधनकारक केले आहे. त्या प्रकल्पात प्रक्रिया करुन त्यानंतर हे पाणी संबधित गृहनिर्माण सोसायटीने नदीत सोडणे आवश्यक आहे. मात्र काही सोसायट्यांचे प्रकल्प बंद अवस्थेत असल्याच्या तक्रारी महापालिकेकडे आल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर खासगी सोसायट्यांमधील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पात पाण्यावर किती प्रक्रिया होते, हे तपासण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या प्रकल्पांवर डिजिटल नजर ठेवण्याची तयारी महापालिका प्रशासनाने केली आहे. बांधकाम प्रकल्पांवर लावण्यात आलेली सेन्सर प्रणाली या प्रकल्पांवर लावून त्यावर लक्ष ठेवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. यामुळे हे प्रकल्प सुरू आहेत की नाही? तसेच पाणी किती शुद्ध होते? याची सविस्तर माहिती महापालिकेला एका क्लिकवर मिळणार आहे, अशी माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी दिली.

शहरातील विविध भागांमध्ये सर्वसाधारण ७५० पेक्षा अधिक खासगी एसटीपी प्रकल्प सुरु आहेत. नव्या नियमानुसार १०० पेक्षा जास्त फ्लॅट्स असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये एसटीपी बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, अनेक ठिकाणी एसटीपी बसवले असले तरी ते नियमितपणे सुरू ठेवले जातात का? त्यांची देखभाल योग्य प्रकारे केली जाते की नाही? तसेच त्यांच्याकडून शुद्ध केले जाणारे पाणी निकषांनुसार आहे का? याची संपूर्ण माहिती यामुळे महापालिकेला समजणार आहे. नदीचे प्रदूषण कमी करण्यासाठी केंद्र सरकारच्या अमृत योजने अंतर्गत शहरात विविध सांडपाणी प्रकलपांचे कामे सुरू आहे. यातील ५ प्रकल्प येत्या काही महिन्यात पूर्ण क्षमतेने सुरू होणार आहे.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज म्हणाले, खासगी सोसायट्यांमधील एसटीपी प्रकल्पांना सेन्सर प्रणाली लावल्यामुळे प्रकल्पातील पाण्याचा प्रवाह, प्रक्रिया स्थिती आणि गुणवत्ता याबाबतची माहिती थेट महापालिकेला मिळणार आहे. यामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सोसायट्यांवर कारवाई करणे सोपे होईल. यामुळे पाणी पुनर्वापराला चालना मिळणार असून नदी-नाल्यांमधील प्रदूषणाला आळा बसेल.




### ७५० हून अधिक खासगी एसटीपी प्रकल्प

» शहरात सध्या ७५० पेक्षा अधिक खासगी एसटीपी प्रकल्प कार्यरत आहेत. १०० पेक्षा जास्त फ्लॅट्स असलेल्या सोसायट्यांमध्ये एसटीपी बसविणे बंधनकारक आहे. मात्र काही प्रकल्प बंद अवस्थेत असल्याच्या तक्रारी आल्याने महापालिकेने कठोर पावले उचलली आहेत. सेन्सरद्वारे पाण्याची गुणवत्ता आणि प्रक्रिया तपासली जाणार आहे.

### सेन्सर प्रणालीची अंमलबजावणी

» पुणे महापालिकेने शहरातील वाढते प्रदूषण लक्षात घेऊन खासगी गृहनिर्माण सोसायट्यांमधील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांवर (एसटीपी) सेन्सर बसविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रणालीमुळे प्रकल्प सुरू आहेत की नाही, तसेच प्रक्रिया योग्य पद्धतीने होते का, याची माहिती थेट प्रशासनाला मिळणार आहे. डिजिटल देखरेखीमुळे नियमांचे उल्लंघन टाळणे शक्य होणार आहे.

### नदी प्रदूषणावर नियंत्रण

» मुळा-मुठा नदीचे प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिका विविध उपाययोजना राबवत आहे. अमृत योजनेअंतर्गत नवीन सांडपाणी प्रकल्प सुरू असून काही प्रकल्प लवकरच पूर्ण क्षमतेने कार्यरत होतील. सेन्सर प्रणालीमुळे पाणी पुनर्वापराला चालना मिळेल आणि नदी-नाल्यांमध्ये जाणारे अशुद्ध पाणी रोखणे अधिक प्रभावी ठरेल.

# ‘समान पाणीपुरवठा’च्या ‘त्या’ ठेकेदाराला पन्नास हजारांचा दंड

## कामांतील दिरंगाईबाबत महापौरांनी लावली चौकशी; अभियंत्यांनी घेतला कामाच्या सद्यस्थितीचा आढावा

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील समान पाणीपुरवठा प्रकल्पांतर्गत जलवाहिनीच्या गुणवत्तेसह कामांत ठेकेदाराकडून होणाऱ्या दिरंगाईबाबत ‘लोकमत’ने वृत्त प्रकाशित करताच संपूर्ण प्रशासन कामाला लागले आहे. महापौर मंजुषा नागपुरे यांनी या प्रकरणी चौकशी अहवाल मागवला आहे. त्यानंतर समान पाणीपुरवठा प्रकल्प विभागाचे अधीक्षक अभियंता ललित बेंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी अभियंता विनोद क्षीरसागर, उपअभियंता मुकेश पवार, कनिष्ठ अभियंता मनीषा पिसाळ यांनी समान पाणीपुरवठा प्रकल्पांतर्गत ठेकेदाराला नमूद केलेल्या सर्व कामांचा सद्यस्थितीमध्ये आढावा घेतला. त्यात बहुतांश कामे अपूर्ण अवस्थेत असल्याचा ठपका ठेकेदारावर ठेवण्यात आला आहे.

याप्रकरणी निविदा अटी-शर्तीनुसार मुदतीत राडारोडा न उचलल्याने व जॅक व पुषचे काम बंद ठेवल्याने संबंधित ठेकेदार कंपनीला ५० हजारांचा दंड ठोठावण्यात आला असून, ही दंडाची रक्कम रनिंग बिलामधून कपात करण्यास मान्यता मिळावी, असा अहवाल समान पाणीपुरवठा प्रकल्पाच्या अभियंत्यांनी मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांच्याकडे सादर केला आहे. यावर जगताप काय कार्यवाही करतात? याकडे लक्ष लागले आहे.



> “ अद्याप माझ्याकडे संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी अहवाल सादर केलेला नाही. अहवाल वाचल्यानंतर मी संबंधित ठेकेदारावर योग्य ती कार्यवाही करण्याचा निर्णय घेईन. कुठलीही वस्तूनिष्ठ माहिती न घेता बोलणे उचित ठरणार नाही.
>
> - मंजुषा नागपुरे, महापौर, पीएमसी

> “ जलवाहिनीची गळती शोधण्यासाठी हायड्रॉलिक चाचणी करावीच लागते. क्षमतेपेक्षा अधिक पाणीपुरवठा कार्यान्वित करावा लागतो. या प्रक्रियेच्या आधी जलवाहिनी स्वच्छ करण्यासाठी पाणी सोडण्यात आले होते. जलवाहिनीत बंद प्लेट ठेवण्यात आल्या होत्या. संबंधित ठेकेदार कंपनीकडून नजरचुकीने बंद प्लेट वेळीच न काढल्या गेल्याने तांत्रिक बिघाड झाला होता. जलवाहिनीची दुरुस्ती करून तातडीने रस्त्यावरचा राडारोडा उचलून रस्ते दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.
>
> - मनीषा पिसाळ, कनिष्ठ अभियंता, समान पाणीपुरवठा प्रकल्प, पीएमसी

# लोणी काळभोर मुळा-मुठा नदीपात्रातील कचऱ्याची आग कायम

## मुळा-मुठा नदीपात्रात कचऱ्याला लागलेल्या आगीमुळे एमआयटी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना श्वसनाचा त्रास होऊन रुग्णालयात दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

लोणी काळभोर परिसरातील मुळा-मुठा नदीच्या पात्रात अवैधरित्या टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याला शुक्रवारी सकाळी भीषण आग लागल्याची घटना समोर आली. या आगीमुळे परिसरात प्रचंड विषारी धुराचे लोट पसरले असून श्वास घेण्यास त्रास झाल्याने एमआयटी शिक्षण संकुलातील काही विद्यार्थ्यांना शुक्रवारी मध्यरात्री जवळच्या रुग्णालयात भरती करावे लागले. एमआयटी शिक्षण संकुलातील कर्मचाऱ्यांच्या मदतीने आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाचे शर्थीचे प्रयत्न शनिवारीदेखील सुरू होते.

एमआयटी शैक्षणिक संकुलात सध्या राज्यासह देश-विदेशातून आलेले जवळपास २०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यापैकी जवळपास ५,००० विद्यार्थी व १,००० कर्मचारी शैक्षणिक संकुलाच्या परिसरात वास्तव्यास आहेत. नदीपात्रात टाकलेल्या कचऱ्याला लागलेली आग अग्निशमन दलाने शुक्रवारी दिवसभर प्रयत्न करूनही विझवता आली नाही. त्यामुळे रात्री ती आणखी वाढून विषारी धुराचे प्रचंड मोठे लोट परिसरात जमा झाले.

यामुळे वसतिगृहातील तसेच परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होणे, डोळ्यांची जळजळ होणे, घसा बसणे इत्यादी त्रास झाला. तसेच, शिक्षण संकुलातील विद्यार्थ्यांना विषारी धुरामुळे शुक्रवारी मध्यरात्री अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात भरती करण्यात आले.

विषारी वायूच्या लोटांमुळे परिसरातील दृश्यमानता प्रचंड कमी झाली. याचा परिणाम शनिवारी पहाटे पुणे-सोलापूर महामार्गावरील वाहतुकीवरही झाला. तसेच, या विषारी धुराच्या लोटांमुळे परिसरातील एका कंपनीच्या कर्मचाऱ्यांना व एमआयटी शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांना शनिवारी सुट्टी द्यावी लागली. शनिवारी

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून लोणी-काळभोर व कदमवाकवस्ती ग्रामपंचायतीचे सरपंच, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, पोलिस पाटील व स्थानिक अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला.

स्वच्छ भारत मोहिमेच्या पार्श्वभूमीवर देशभरात स्वच्छता आणि नदी संवर्धनासाठी प्रयत्न सुरू असताना, लोणी काळभोर येथे मात्र पुणे शहराची जीवनवाहिनी असलेल्या मुळा-मुठा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर थेट कचरा टाकून तो जाळण्याचा प्रकार अनेकदा उघडकीस आला आहे.

लोणी काळभोर आणि कदमवाकवस्ती या पुणे शहराला लागून असलेल्या मोठ्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायती आहेत. त्यामुळे सदर ग्रामपंचायतींच्या हद्दीत दररोज मोठ्या प्रमाणात ओला व सुका कचरा निर्माण होतो. परंतु या ठिकाणी कचरा संकलनासाठी जागा तसेच कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी तांत्रिक प्रकल्प आजमितीस उपलब्ध नाही.



### नदीपात्रातील कचरा व्यवस्थापनाचा गंभीर प्रश्न

» लोणी काळभोर आणि कदमवाकवस्ती ग्रामपंचायतींच्या हद्दीत दररोज मोठ्या प्रमाणात ओला व सुका कचरा निर्माण होतो. मात्र, कचरा संकलन व प्रक्रिया प्रकल्पांची कमतरता असल्याने सुमारे ३० ते ३५ ट्रॉली कचरा थेट मुळा-मुठा नदीच्या पात्रात टाकला जातो. यामुळे नदीपात्रात कचऱ्याचे ढीग साचले असून दुर्गंधी, वायुप्रदूषण आणि जलप्रदूषणात मोठी वाढ झाली आहे. अलीकडेच या कचऱ्याला लागलेल्या आगीमुळे विषारी धुराचे लोट परिसरात पसरले आणि नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम झाला. श्वास घेण्यास त्रास, डोळ्यांची जळजळ अशा तक्रारी वाढल्या. पर्यावरणप्रेमींच्या मते, नदी संवर्धनाच्या दृष्टीने हा प्रकार अत्यंत गंभीर असून तातडीने कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे, कचरा टाकण्यावर बंदी आणि दोषींवर कारवाई करणे गरजेचे आहे.

> “ लोणी-काळभोर व कदमवाकवस्ती या दोन्ही ग्रामपंचायतींनी यापूर्वीच अनेक वेळा घनकचरा व्यवस्थापनासाठी वेगळी जागा मिळावी यासाठी जिल्हा परिषद व जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवले आहेत. तो अद्यापही शासन दरबारी प्रलंबित आहे. शासनाकडून दोन्ही ग्रामपंचायतींना तातडीने जागा मिळाल्यास त्या ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारता येईल.
>
> \- चित्तरंजन गायकवाड, माजी सरपंच, कदमवाकवस्ती ग्रामपंचायत

> “ पुणे शहराची जीवनवाहिनी असलेल्या मुळा-मुठा नदीपात्रात थेट कचरा टाकणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. नदीपात्रात कचऱ्याचे डोंगर उभे असून त्यास सातत्याने आग लागण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे विषारी धुराचे लोट तयार होऊन विद्यापीठातील विद्यार्थ्यांना श्वसनाच्या समस्या जाणवत आहेत. जिल्हा प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने हस्तक्षेप करावा.
>
> \- डॉ. महेश चोपडे, कुलसचिव, एमआयटी एडीटी विद्यापीठ, लोणी-काळभोर

# पुणे विमानतळावरून दुबई-अबू धाबी विमान सेवा युद्धजन्य परिस्थितीमुळे रद्द

## मध्यपूर्वेतील तणावामुळे चार आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द; प्रवाशांसाठी पर्यायी पर्याय व तिकीट परतावा उपलब्ध

**पुणे | प्रतिनिधी**

मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे आणि युद्धाच्या परिस्थितीमुळे पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अबू धाबी, दुबईसाठी होणारी चार आंतरराष्ट्रीय उड्डाणे शनिवारी (दि. 28) रोजी रद्द करण्यात आली. त्यामुळे पुण्याहून दुबई, अबू धाबी जाणाऱ्या प्रवाशांची नियोजित कामे रखडली.

अचानक तणावपूर्ण परिस्थितीमुळे शनिवारी पुण्यातून अबुधाबी आणि दुबई भागात जाणारी चार विमाने रद्द केली. यात स्पाईस जेट कंपनीचे (फ्लाईट क्रमांक -एसजी 51) पुणे ते दुबई, रात्री 8 वाजून 30 मिनिटांनी होणारे उड्डाण रद्द केले. तसेच एअर इंडिया एक्स्प्रेसचे (फ्लाईट क्र. आयएक्स 283) पुणे ते अबू धाबी, रात्री 9 वाजून 5 मिनिटांनी होणाऱ्या विमानाचे उड्डाण रद्द करण्यात आले. याशिवाय इंडिगो (फ्लाईट क्र. 6ई 1484/1483 दुबई-पुणे-दुबई, रात्री 10.30 वाजता येणारे आणि 1 मार्च रोजी पहाटे 1 वाजून 30 मिनिटांनी दुबईकडे जाणारे विमान रद्द करण्यात आले आहे. प्रवाशांची तिकीट परतावा किंवा युद्धजन्य स्थिती संपल्यानंतरच्या पुढील तारखांचे पर्यायी उड्डाणांचे पर्याय दिले जात आहेत.

लोहगाव विमानतळावून दुबईकडे जाणाऱ्या दोन विमानांसाठी अनुक्रमे १५८ आणि १८८ प्रवाशांनी तिकिटे आरक्षित केली होती. तसेच अबुधाबीकडे १४८ प्रवासी जाणार होते. परंतु, युद्धामुळे सौदी अरेबियातील हवाई क्षेत्रातील विमान वाहतूक बंद करण्यात आली आहे. त्यामुळे भारतीय विमान वाहतूक कंपन्यांनीही खबरदारीचा उपाय म्हणून शनिवारी होणारी उड्डाणे रद्द केली आहेत.

याबाबत विमान वाहतूक कंपन्यांनी प्रवाशांशी संपर्क साधून त्यांना माहिती दिली आहे, अशी माहिती लोहगाव विमानतळाचे संचालक संतोष ढोके यांनी दिली. दरम्यान, आखातामध्ये देशातून होणारी विमान वाहतूक सेवा प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी शनिवारपासून थांबविण्यात आल्याची माहिती एअर इंडिया एक्सस्प्रेसच्या प्रवक्त्याने दिली आहे.




> “ मध्यपूर्वेतील अस्थिर परिस्थितीमुळे सुरक्षेच्या कारणास्तव अबू धाबी, दुबईला होणारी चार उड्डाणे शनिवारी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही विमानतळावर प्रवाशांच्या मदतीसाठी अतिरिक्त कर्मचारी तैनात केले आहेत. प्रवाशांनी विमानतळावर येण्यापूर्वी आपल्या संबंधित एअरलाईनशी संपर्क साधून फ्लाईटचे स्टेटस तपासावे, जेणेकरून त्यांची गैरसोय होणार नाही. प्रवाशांची सुरक्षितता हीच आमची प्राथमिकता आहे.
>
> \- संतोष ढोके, संचालक, पुणे विमानतळ